मराठी पाऊल पडते पुढे!!

मातृभाषा मराठीला, मराठी संस्कृतीला, जनतेला आणि महाराष्ट्राला आजपर्यंत या ना त्या रूपाने साहाय्य करणाऱ्या आणि सेवा देणाऱ्या



# सर्व हितचिंतकांना शतशः धन्यवाद!!!



मराठी भाषेच्या विकासासाठी हे ७ स्लाईड्सचे प्रेझेंटेशन आहे.

टीपः जागृतीसाठी या संदेशाचे विविध माध्यमांद्वारे कृपया मोफत वितरण करा.

# प्रिय आमुचा एक महाराष्ट्र देश हा!

**मराठी पाऊल पडते पुढे!!**



- महान, प्राचीन संस्कृतीचा आणि महान आदर्शांचा आपला भारत देश.
- वीर छत्रपती शिवरायांचा, टिळकांसारख्या स्वातंत्र्यवीरांचा, गणपतीबाप्पाचा, विठूमाऊलीचा, ज्ञानोबा तुकारामांचा, अव्वल कलाकारांचा आपला महाराष्ट्र!
- सह्याद्रीच्या रांगांचा, गड किल्ल्यांचा, नद्यांचा, विस्तीर्ण समुद्रकिनाऱ्यांचा, हिरव्यागार वनराईचा, वेरुळ अजिंठासारख्या जगप्रसिध्द लेण्यांचा आपला महाराष्ट्र!



- खेडयांचा, शहरांचा, उद्योगधंद्यांचा, आयटी कंपन्यांचा प्रगतीशील महाराष्ट्र!
- आपली मातृभूमी, जन्मभूमी, कर्मभूमी आपला संयुक्त महाराष्ट्र आपण ५ वर्षांचे आंदोलन व १०५ हुतात्म्यांच्या बलिदानानंतर १ मे १९६० रोजी मिळविला.



- अशा महाराष्ट्राचा आम्हाला अभिमान आहे! ‘अमृतातेही पैजा जिंकणाऱ्या’ आमच्या मातृभाषेचा, संस्कृतीचा आणि अस्मितेचा आम्हाला अभिमान आहे!!



- आपल्या महाराष्ट्रात मराठी भाषेचे, संस्कृतीचे रक्षण, संवर्धन आणि भरभराट करा. लक्षात ठेवा, मराठी भाषेची आणि माणसांची प्रगती मराठी माणसाच्याच हातात आहे.

महाराष्ट्र बनतोय 'कॉस्मोपॉलिटन्'




मराठी पाऊल पडते पुढे!!

महाराष्ट्रात मराठीचा वापर हळूहळू कमी होत आहे.

मुंबईत व्यवहारातून मराठी भाषा हद्दपार झाली,
संपूर्ण महाराष्ट्राची ही स्थिती होऊ देवू नका!

# मराठीतच बोला, मराठी वाचवा!

# महाराष्ट्राचे मराठीपण टिकवा!!!

## राज्यात स्थायिक होणाऱ्यांना मराठी बोलता आलेच पाहिजे!

लोकशाहीत प्रत्येकाला भाषा स्वातंत्र्य आहे. मराठीला भारतीय राज्यघटनेची मान्यता आहे. मराठीचा विकास आपल्याच हातात आहे.




मराठी पाऊल पडते पुढे!!

बंगलोर रेल्वे स्थानकः राज्यभाषा <u>कन्नडचा प्रथम वापर</u> सक्तीचा!!

# राज्यातील सर्व <u>फलकांवर</u> इंग्रजी/हिंदी बरोबरच <u>मराठी भाषेचा वापर केला जात नाही</u>.

# उदा. दुकाने, खाजगी कंपन्या, केंद्र सरकारची कार्यालये, रेल्वे स्थानके, हॉटेले, महामार्ग, विमानतळे इ.

पुणे रेल्वे स्थानकः <u>हिंदीबरोबर राज्यभाषा मराठीचा वापर का नाही</u>? आम्ही हे सहन करतो.




लोकशाहीत प्रत्येकाला भाषा स्वातंत्र्य आहे. मराठीला भारतीय राज्यघटनेची मान्यता आहे. मराठीचा विकास आपल्याच हातात आहे.

# महाराष्ट्रात कुठे आहे मराठी?

मराठी पाऊल पडते पुढे!!

- राज्यातील नोकऱ्यांमध्ये मराठी माणूस?: रेल्वे, केंद्र सरकारी नोकऱ्या, खाजगी कंपन्यांतील नोकऱ्या, सर्व राज्य शासनाच्या नोकऱ्या, राजकीय नेत्यांची पदे इ.
- मोठया शहरांमध्ये व्यवहारात मराठी भाषा?: इथे मराठीवाचून कोणाचेही अडत नाही कारण ‘हिंदी चलता है।’. मराठी माणसाला मराठीबद्दल अभिमान आणि आग्रह नाही. त्यामुळे परप्रांतीय लोक इथे नोकऱ्या धंदे करतात पण मराठी शिकत नाहीत!!
- शहरांमध्ये सार्वजनिक ठिकाणी फलकांवर मराठीचा वापर?: सर्व दुकाने, खाजगी कंपन्या, केंद्र सरकारची कार्यालये, रेल्वे स्थानके, हॉटेले, महामार्ग, विमानतळे इ.
- ग्राहक सेवांमध्ये?: दूरध्वनी सेवा देणाऱ्या कंपन्यांचे संदेश, फॉर्म्स इ.
- सर्व अमराठी शाळांमध्ये?: व्यावहारिक आणि सोपा मराठी विषय अनिवार्य
- मनोरंजनाची माध्यमे?: बहुसंख्य चित्रपटगृहे आणि एफ् एम् वाहिन्यांवर
- **मित्रांनो, आपल्या मराठीला महाराष्ट्रात आश्रय व संरक्षण द्या. मराठीचा आग्रह धरा! प्रगतीसाठी इंग्रजी आणि नवीन तंत्रज्ञान जरुर शिका, कष्ट करा पण मराठी वाचवा!**



जय महाराष्ट्र! जय भारत!!

**Feedback:** marathi_vikas@rediffmail.com, Dec2006

लोकशाहीत प्रत्येकाला भाषा स्वातंत्र्य आहे. मराठीला भारतीय राज्यघटनेची मान्यता आहे. मराठीचा विकास आपल्याच हातात आहे.

# आता तरी मराठीबद्‌दल उदासिनता सोडा... मराठी पाऊल पडते पुढे!!

- आज महाराष्ट्र 'कॉस्मोपॉलिटन' बनतोय. नोकरी धंद्यानिमित्त इतर राज्यांतील लोंढे येथे स्थलांतरीत होत आहेत पण राज्यभाषा मराठी रूजविण्याचे प्रयत्न होत नाहीत!
- मराठी भाषिकांनाच मराठीचा अभिमान नाही. मराठी माणूसच इथे मराठी बोलत नाही. मराठीवाचून इथे कुणाचे काहीही अडत नाही. मुंबई, पुण्याचेच उदाहरण घ्या ना...!
- "यहाँ मराठी नही आता तो भी चलता है।" यामुळे इतर लोक मराठी शिकत नाहीत आणि मराठीचा व्यवहारातील वापर हळूहळू कमी होत आहे. मराठी चेहरा हरवतोय...
- भाषा हा संस्कृतीचा प्राण आहे! महाराष्ट्रात मराठी टिकवा!!...कृपया सार्वजनिक ठिकाणी मराठी बोला. सार्वजनिक फलक, सेवांमध्ये मराठीच्या वापराबाबत आग्रह धरा. सरकारची मदत घ्या. मराठी माणसांना राज्यात नोकऱ्यांमध्ये प्राधान्य मिळण्यासाठी योग्य रितीने प्रयत्न करा. प्रगतीसाठी नवीन तंत्रज्ञान शिका, कष्ट करा, इंग्रजीत प्राविण्य मिळवा पण कृपया मराठी वाचवा. महाराष्ट्राचे मराठीपण टिकवा!!
- जनतेत मराठीबद्‌दल अभिमान, एकी, गोडी, जागृती आणि जागरूकता निर्माण करा.

जय महाराष्ट्र! जय भारत!!

**Feedback:** marathi_vikas@rediffmail.com, Dec2006

# प्रिय मराठी बंधुभगिनींनो...नम्र आवाहन...

**मराठी पाऊल पडते पुढे!!**

- आपली मातृभूमी, मातृभाषा, संस्कृती, अस्मिता आणि लोकांबद्दल अभिमान बाळगा.
- सार्वजनिक ठिकाणी मराठीचा जाणीवपूर्वक वापर करा. आपणच मराठी बोललो नाही तर समोरचा अमराठी माणूस कधीही मराठी शिकणार नाही, मराठी टिकणार नाही.
- सार्वजनिक फलक, सेवांमध्ये मराठीच्या वापराबाबत आग्रह धरा. सरकारची मदत घ्या.
- स्पर्धेत जिंकण्यासाठी हुषारीने कठीण परीश्रम करा. आपली व आपल्या भाषा बांधवांची शिक्षण, नोकरी व धंद्यामध्ये प्रगती करा, त्यांना मदत करा. आपापसांत भांडू नका.
- नवीन तंत्रज्ञान शिका, इंग्रजीत प्राविण्य मिळवा पण कृपया मराठीला विसरू नका!
- मराठी माणसांना राज्यात नोकऱ्यांमध्ये प्राधान्य मिळण्यासाठी योग्य रितीने प्रयत्न करा.
- नवीन सोपे इंग्रजी पारिभाषिक शब्द स्विकारा. मराठी भाषा शिकणाऱ्यांचे कौतुक करा.
- मराठी चित्रपट, नाटके, चॅनेल्स पाहा. मराठी पुस्तके, भेटकार्डे, वृत्तपत्रे, कॅसेट्स, सीडी खरेदी करा. जनतेत मराठीबद्दल जागृती, अभिमान आणि जागरूकता निर्माण करा.

जय महाराष्ट्र! जय भारत!!

**Feedback:** marathi_vikas@rediffmail.com, Dec2006

लोकशाहीत प्रत्येकाला भाषा स्वातंत्र्य आहे. मराठीला भारतीय राज्यघटनेची मान्यता आहे. मराठीचा विकास आपल्याच हातात आहे.

**मराठी पाऊल पडते पुढे!!**






मराठी माणूस

# आपला महाराष्ट्र, आपली मराठी!!

# शपथ घ्या... एकीने राहू, प्रगती करु,

# मराठी बोलू, मराठी टिकवू!! धन्यवाद!

जय महाराष्ट्र! जय भारत!!

**Feedback:** marathi_vikas@rediffmail.com, Dec2006

लोकशाहीत प्रत्येकाला भाषा स्वातंत्र्य आहे. मराठीला भारतीय राज्यघटनेची मान्यता आहे. मराठीचा विकास आपल्याच हातात आहे.